**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

**साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय, राजगुरुनगर**

**शैक्षणिक वर्ष : 2024-2025**

**अर्थशास्त्र विभाग**

महाविद्यालयाच्या कला शाखेतील **अर्थशास्त्र विभागामध्ये शैक्षणासोबतच विविध उपक्रम** सातत्याने राबविले जातात. शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मध्ये अर्थशास्त्र विभागात प्रथमतः **प्रथम वर्ष कला (FYBA) – 40 विद्यार्थी, द्वितीय वर्ष कला (SYBA) – 10 विद्यार्थी**, आणि **तृतीय वर्ष कला (TYBA) – 6 विद्यार्थी** असे एकूण 56 **विद्यार्थ्यांनी प्रवेश** घेतला.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच त्यांच्या **कला गुणांना व सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी** विभागात विविध नवनवीन उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**पहिले सत्रातील अंतर्गत मूल्यमापन** दरम्यान पार पडले. त्यात **१० गुणांची असाइनमेंट** आणि **२० गुणांची लेखी परीक्षा** घेण्यात आली. तसेच NEP 2024 च्या अनुषंगाने ५ गुणांची असाइनमेंट आणि १० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी नियमितपणे **सराव परीक्षा** देखील घेण्यात आल्या.

दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी राज्यशास्त्र विभागांतर्गत आयोजित **संविधान दिन–जनजागृती विशेष उपक्रमात** अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सक्रीय आणि उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

अशा प्रकारे विद्यार्थ्यांचा **सर्वांगीण विकास** व त्यांच्या **कला आणि शैक्षणिक गुणवत्तेचा विकास** साधण्यासाठी अर्थशास्त्र विभाग सतत कटिबद्ध राहिला आहे.